# शिक्षण विभाग (प्राथमिक)
# जिल्हा परिषद रत्नागिरी
# निविदा सूचना क्र.३ सन २०२५-२६

**शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद रत्नागिरी,मार्फत सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतून (DPC) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये "आदर्श शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविणे" या जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत रत्नागिरी जिल्हा परिषद अखत्यारीतील प्राथमिक शाळांतील जिल्हा परिषद शालेय विद्यार्थ्यांच्या (इ.७ वी) NASA अमेरीका अंतराळ संशोधन संस्थेस भेट घडवून आणणे या अभ्यासदौऱ्यासाठी ट्रॅव्हल कंपनी कडून पुढील प्रमाणे ई-निविदा मागविणेत येत आहेत.**

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित रक्कम रुपये | बयाना अनामत रक्कम रुपये | कोऱ्या निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्विकृतीची तारीख व वेळ | प्रत्येक स्वतंत्र ई निविदा फॉर्म फी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **कामाचेनांव :-** शालेय विद्यार्थ्यांचा अभ्यासदौरा (७वी) अभ्यासदौरा ठिकाण:-NASA अमेरिका **अभ्यासदौऱ्यामध्ये समावेश असलेली सदस्य संख्या :-** ३४ [२०+७ विद्यार्थी ( इ.७ वी) व उर्वरीत ५+२ शिक्षक (१ पु.व १ स्त्री शिक्षिका काळजीवाहक अधिकारी / कर्मचारी असे एकूण ३४ सदस्य] | **२,४०,५५,५००/-** | ४०००००/- | २७/०४/२०२६ ते २१/०५/२०२६ | २७/०४/२०२६ ते २१/०५/२०२६ | ४००००/- |

जिल्हा परिषद शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक **अभ्यासदौऱ्यासाठी** ट्रॅव्हल्स कंपनीकडुन पुढील संभाव्य दौ-याकरीता ई-निविदा मागविणेत येत आहेत.त्या बाबत ई-निविदा फॉर्म, सुचना/अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा http://mahatenders.gov.in या संकेत संस्थळावर दिनांक २७/०४/२०२६ ते दिनांक २१/०५/२०२६ या कालावधीत पहावयास/भरण्यास उपलब्ध असेल.**(अभ्यासदौऱ्याचा कालावधी निश्चित झाल्यानंतर तो मंजुर निविदाधारकास कळविला जाईल.)**

ई-निविदा सादर करताना डीजीटल सिग्नेचर महाराष्ट्र राज्यसरकारने अधिकृत केलेल्या कंपनीची असणे आवश्यक असूनई- निविदा सादरकर्त्याने http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Enrollment करुन ई-निविदा सादर करावयाची आहे.ई-निविदा व डिजिटल सिग्नेचर माहितीसाठी मार्गदर्शन http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.ई-निविदा दिनांक २१/०५/२०२६ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंन्त सादर करता येईल. ऑफलाईन निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

१. निविदेच्या अटी व शर्ती सविस्तर निविदेमध्ये पहावयास उपलब्ध आहेत.
२. ई-निविदा सादर करताना **तांत्रिक व आर्थिक अशा दोन लिफाप्यामध्ये** सादर करावयाची आहे. लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रांची माहिती सविस्तर निवदेमध्ये पहावी.
३. निविदा फी-निविदा फी रुपये ४०,०००/-(अक्षरी चाळीस हजार मात्र) ऑनलाईन पेमेन्ट गेटवे व्दारे जमा करावयाची आहे.
४. बयाणा रक्कम (Earned Money Deposit)- निविदाधारकाने रु.४,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये चार लक्ष मात्र ) बयाणा रक्कमऑनलाईन पेमेन्ट गेटवे व्दारे जमा करावयाची आहे. (अनामत रक्कम भरण्यापासून सूट असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे) (या रक्कमेवर जिल्हा परिषदेमार्फत कोणतेही व्याज दिले जाणार नाही).
५. कोणतीही निविदा स्विकारणे,नामंजूर करण्याचेअधिकार निम्न स्वाक्षरी कर्त्यांनी राखून ठेवला आहे.
६. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निवीदेतून माघार घेतल्यास त्याची इसारा व बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

**सही/-**
(**निलिमा नाईक**)
शिक्षणाधिकारी प्राथमिक
जिल्हा परिषद,रत्नागिरी

**सही/-**
(वैदेही रानडे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,रत्नागिरी

**जिल्हा परिषद रत्नागिरी**

**शिक्षण विभाग (प्राथमिक) विभाग,**

## जाहिर ई-निविदा क्र -३ सन 2025-26

**शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद रत्नागिरी,मार्फत सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतून (DPC) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये "आदर्श शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविणे" या जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत रत्नागिरी जिल्हा परिषद अखत्यारीतील प्राथमिक शाळांतील जिल्हा परिषद शालेय विद्यार्थ्यांच्या (इ.७ वी) NASA अमेरीका अंतराळ संशोधन संस्थेस भेट घडवून आणणे या अभ्यासदौऱ्यासाठी ट्रॅव्हल कंपनी कडून पुढील प्रमाणे ई-निविदा मागविणेत येत आहेत.**

| | | |
|---|---|---|
| १ | **कामाचेनांव** :-जिल्हा परिषद शालेय विद्यार्थ्यांचा अभ्यासदौरा<br>(इ.७वी)<br>**अभ्यासदौऱ्याचेठिकाण:-**<br>NASA,अमेरिका अंतराळ संशोधन संस्थेस व इतर वैज्ञानिकदृष्ट्या महत्वाच्या स्थळांना जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना भेट<br>**अभ्यासदौऱ्यामध्ये समावेश असलेली सदस्य संख्या :-३४**<br>[२७विद्यार्थी (इ.७ वी) व काळजीवाहक ५ +२ शिक्षक (१ पु. व १ स्त्री शिक्षिका काळजीवाहक अधिकारी / कर्मचारी असे एकूण ३४ सदस्य] | दौ-यासाठी अंदाजीत रक्कम रुपये **२,४०,५५,५००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी चाळीस लक्ष पंचावन्न हजार पाचशे मात्र)** |
| ni२ | ई-निविदा फी रुपये | रु.४०,०००/-(अक्षरी चाळीस हजार मात्र) |
| ३ | बयाणा रक्कम रुपये | रु.४,००,०००/- (अक्षरी- चार लक्ष मात्र) |
| ४ | ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | दि.२७/०४/२०२६ वेळ सकाळी १२.०० |
| ५ | ई-निविदा सादर करण्याचा कालावधी | दि. २७/०४/२०२६ वेळ सकाळी १२.०० ते<br>दि.२१/०५/२०२६ वेळ सायंकाळी १७.०० |
| ६ | प्री बीड मिटींग (मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात) | दि. ३०/०४/२०२६ वेळ सकाळी १२.०० |
| ७ | ई-निविदा फी व बयाणा रक्कम भरण्याचा दिनांक | दि. २७/०४/२०२६ वेळ सकाळी १२.०० ते<br>दि.२१/०५/२०२६ वेळ सायंकाळी १७.०० |
| ८ | ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दि. २२/०५/२०२६ वेळ सायं.१८.०० वा. |
| ९ | ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद,रत्नागिरी यांचे दालन, संपर्क दुरध्वनी क्रं.०२३५२-३५०७०६ |

जिल्हा परिषद, रत्नागिरीच्या वतीने **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,** रत्नागिरी हे सदरची निविदा मागवित आहेत. तसेच सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी सदर निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर ऐनवेळी बदल करण्याचे किंवा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.ई-निविदा http://mahatenders.gov.in या संकेत संस्थळावर उपलब्ध आहे.ई-निविदा सादर करताना डिजीटल सिग्नेचर महाराष्ट्र राज्य सरकारने अधिकृत केलेल्या कंपनीची असणे आवश्यक असून ई-निविदा सादरकर्त्याने http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Enrollment करुन ई-निविदा सादर करावयाची आहे.ई-निविदा व डिजिटल सिग्नेचर माहितीसाठी मार्गदर्शन http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धआहे.

विद्यार्थ्यांचा अभ्यासदौरा हा जिल्हा परिषदेच्या प्रांगणातुन निघेल. (अभ्यासदौऱ्यासाठी निघण्याची वेळ तिकीट आरक्षण झाल्यानंतर निश्चित केली जाईल.) **अभ्यासदौऱ्यासाठी सदस्यांची संख्या ३४ पर्यंत असेल. त्यापैकी २७ विद्यार्थी (इ.७ वी) व उर्वरीत अधिकारी व शिक्षक असतील.**

**अभ्यासदौऱ्याचा प्रवास खालील प्रमाणे असेल**

**NASA भेटीचा कार्यक्रम**

**ITINERARY:**

**Day 01:Arrive into Miami**
Welcome to Miami! On arrival, proceed to restaurant for dinner and then transfer hotel for check-in.
(D)

**Day 2:**
**Miami to Orlando- The fun capital of the world.**
After breakfast, proceed for "Orientation tour of Miami". Later, travel to Orlando and evening free for
own activities. Overnight in Orlando.
(B, L, D)

**Day 03:**
**Enjoy ATX Camp**
Today, step into a world of fantasy as you proceed to Visit the ATX Camp - ASTRONAUT TRAINING
EXPERIENCE - rain like the next generation of space explorers who will travel to Mars. Join the crew as you
begin a spectacular new mission simulation including launching, landing and walking on Mars. You will also
perform a spacewalk through exciting and immersive microgravity simulation technology. Overnight in
Orlando.
(B, CA, D)

**Day 04:**
**Visit to "NASA"- Kennedy Space Centre Visitors Complex.**

Today, proceed to the Kennedy Space Centre's Visitors Complex of National Aeronautics and Space
Administration. Visit space exploration, space shuttle simulators, enjoy 3D shows at IMAX Theater and see
Space shuttle Atlantis up close. Later get on a bus tour and visit Launch Complex, site of many Apollo and
space shuttle launches. Later day is free for you to explore the Sea World theme park that offers up-close
animal experiences like, Shark Encounter, Dolphin Cove, Penguin Encounter, Dolphin nursery, Stingray
Lagoon and more. Also explore various rides like, Journey to Atlantis, Kraken, Wild Arctic, Manta, Sky tower
and more. Overnight in Orlando
(B, CA, D)

**Day 05:**

**Fly to Las Vegas. Onto the Dazzling City of Las Vegas. Helicopter ride**

Today, we fly to Las Vegas. On arrival, check-in to your hotel. Later you can explore the grandeur of your
own hotel or you can just walk along the Las Vegas Boulevard - the main street. You will be awed by the
lights and huge neon signs as you pass hotels such as Bellagio, Paris and others with dazzling facades along
the famous 'Las Vegas Strip'.
Overnight in Las Vegas. (B,
D)

**Day 06:**

**Onto Los Angeles.Orientation tour of Los Angeles. Visit Hollywood Boulevard**

Today, we drive to Los Angeles. Later, proceed for an orientation tour of Los Angeles. Visit the Main Street in
Hollywood -"Hollywood Boulevard" walk along the Hollywood Walk of Fame, the Dolby Theatre which hosts
the Oscars. Also see the TCL Chinese theatre. Later, drive through Sunset Boulevard, Beverly Hills and many
more sights. Overnight in Los Angeles.
(B, L, D)

**Day 7**

**Full day at Universal Studios**.

Today avail the opportunity of visiting Universal studios, the work place of Hollywood's biggest and most
glamorous stars. Go on the legendry Studio Tram Tour. Enjoy breathtaking rides like Transformers 3D,
Jurassic park, Revenge of the Mummy and experience the 'Wizarding World of Harry Potter' and many
more. Overnight in Los Angeles.
(B, L, D)

**Day 08:**
**Drive to San Francisco Enroute visit Monterey Bay Aquarium**
Today, we drive to San Francisco. Enroute visit Monterey Bay Aquarium and then proceed to San Francisco for overnight stay.
(B, L, D)
**Day 9:**
**Guided City Tour of San Francisco.**
On arrival, proceed to your hotel and check-in. Later we proceed for a guided tour of "The Golden City". See the Civic Centre, Union square, Fisherman's Wharf, Twin Peaks and many more sites. Overnight in San Francisco.

**Day 10:**
**Visit to Apple Visitors Park. Google Campus visit.**
Today we drive to Cupertino and step into the heart of the Apple empire at this sleek and modern building—the only part of the Apple Park campus that's open to the public. Here, you can tour the innovative exhibition space for a behind-the-scenes look at Apple's journey, technology, and design principles, head up to the roof terrace for an expansive view of Apple Park. Later proceed to The Google campus which is open for tourists to walk around 7 days a week. However, most office buildings and the merchandise store is closed on weekends. Google buildings are restricted to employees and their guests, but you can still visit the central point of Google's headquarters. This cluster of buildings is just west of Charleston Park, a large green area in the city. Overnight in San Francisco.
(B, L, D)

**Day 11:**
**Fly Back Home with pleasant memories.**
Today, proceed to the airport as your memorable tour comes to an end. Please do spare a few moments of your valuable time to write and share with us your wonderful experience.
(B)

****TOUR ENDS****

**<u>निविदेच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.</u>**

**A) निविदेच्या रकमा जमा करणे-**

१. निविदा फी-निविदा रुपये–४०,०००/-(अक्षरी रूपये चाळीस हजार मात्र) ऑनलाईन पेमेन्ट गेटवे व्दारे जमा करावयाची आहे.(**नापरतावा**)
२. बयाणा रक्कम (Earned Money Deposit) निविदाधारकाने रु.४,००,०००/-(अक्षरी रु.चार लक्ष मात्र) बयाणा रक्कम ऑनलाईन पेमेन्ट गेटवे व्दारे जमा करावाची आहे. या रक्कमेवर कोणते ही व्याज दिले जाणार नाही. (**परतावा- अभ्यासदौऱ्याचा** समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतर)

**B)** सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**C)**ई-निविदेच्या BOQ मध्ये निश्चित दर नमुद केलेले नसतील अथवा दरांमध्ये संदिग्धता असेल निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल. जर अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत असेल तर दोन्ही पैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

**D)** निविदा धारकांनी सादर केलेले दर हे ई-निविदा उघडण्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांपर्यंत स्वीकृतीस पात्र राहतील.

**E)** प्रवासाच्या कालावधी मध्ये प्रवासाचे ठिकाण किंवा अंतर जास्त किंवा कमी होऊशकेल.

F) विदेशात अभ्यासदौरा पूर्ण केल्याचा अनुभव योग्य त्या पुराव्यांसह सादर करावा.

**G) निविदाधारकाने करायची कामे-**

१. निवड झालेले सर्व विद्यार्थी व वयाच्या अटी लागू असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे व अधिकारी यांचे PASSPORT काढणे तसेच VISA प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अमेरिकन दुतावास मुंबई यांचेशी संपर्क करून यासाठी आवश्यक ते शुल्क भरून VISA काढून घेणे. सदर प्रक्रिये दरम्यान वेळोवळी आवश्यकतेनुसार निवास चहा नाष्टा व जेवणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी.
२. निवड झालेले सर्व विद्यार्थी व अधिकारी यांचे PASSPORT काढणेसाठी पासपोर्ट ऑफिस ला ने आण करणे तसेच Visa साठी जाताना निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या तालुक्यापासून ते मुंबई,मुंबई ते रत्नागिरी ते परत तालुक्यापर्यंत बस/ रेल्वे बुकिंग निवास व भोजन व्यवस्था करणे.
३. Airport ला जाण्यासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या तालुक्यापासून- रत्नागिरी ते मुंबई, मुंबई ते तालुक्यापर्यंत परत बस/ रेल्वे बुकिंग निवास व भोजन व्यवस्था करणे.
४. शैक्षणिक **अभ्यासदौऱ्या** साठी निवडलेले विद्यार्थी, अधिकारी यांचा **अभ्यासदौऱ्या**च्या कालावधीसाठी आंतरराष्ट्रीय वैद्यकीय आणि अपघात विमा उतरविणे. (विमान प्रवासासह)
५. **दौरा सुरु होताना** जिल्हा परिषद,रत्नागिरी प्रांगणात विद्यार्थी जमल्यानंतर त्यांच्या नाष्ट्याची व्यवस्था करणे. (सकाळचा नाष्टा ०८.०० ते ०९.००,चहा/कॉफी/बॉर्नव्हिटा/दुध/नाष्टा पोहे,इडली व तत्सम ११.१५ ते ११.३०, दुपारचे जेवण ०१.०० ते ०२.०० (शाकाहारी व मांसाहारी),चहा/कॉफी / बॉर्नव्हिटा/दुध / फुड पॅकेट दुपारी २.००ते ४.३०, रात्रीचे जेवण ०८.००ते ०९.००(शाकाहारी व मांसाहारी), या

वेळापत्रकात परिस्थितीनुसार बदल होऊ शकतो. **<u>आवश्यकतेनुसार वेळ पडल्यास विमानतळावर देखील जेवणाची सुविधा द्यावी लागेल.</u>**)

६. विमान प्रवासासाठी तिकीट आरक्षण करणे. (जाताना- **Mumbai to** Miami,Miami **to Orlando,Orlando to Las Vegas,Las Vegas** to Los Angeles , Los Angeles to San Francisco )तिकीट आरक्षण झाल्यानंतर आरक्षणाचा दिनांक वेळ (परतीसह) कार्यालयास अवगत करणे. त्यानुसार जाण्या-येण्याचे वेळापत्रक तयार केले जाणार आहे.

**सदर दौऱ्यामध्ये पान क्र ४, ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या भेटीच्या कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या स्थळांना भेट देणे अभिप्रेत आहे.**

७. **पान क्र. ४, ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या भेटीच्या कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या स्थळांना भेटी द्यावयाच्या आहेत. भेटी देण्यासाठी जिल्हा परिषद रत्नागिरी ते मुंबई विमानतळ, भेटी कार्यक्रमामध्ये नमूद स्थळे व परत येताना मुंबई विमानतळ ते जिल्हा परिषद रत्नागिरी** अशा प्रवासासाठी **३४ आसन क्षमता** (वातानुकुलीत यंत्रणेसह) असलेल्या वाहनाची व्यवस्था करणे.त्यामध्ये प्राथमिक उपचार, अग्नीशमन यंत्रणा यासारख्या प्राथमिक अत्यावश्यक सुविधांचा समावेश असणे आवश्यक आहे.

८. **अभ्यासदौऱ्या**साठी आवश्यक असलेले (विमानप्रवास, स्पेस स्टेशन, म्युझीयम व भेटीच्या कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या स्थळांना भेटद्यावयाच्या ठिकाणांना भेट देण्यासाठी आवश्यक असणा-या परवानग्या, नावनोंदणी इ. प्राप्त करुन घेणे व गरजेनुसार शुल्क भरणे.टोल व पार्किंग चार्जेस इ.) सर्व परवाने तसेच अमेरिका प्रवासादरम्यान हॉटेल मधील द्यावयाचे टिप, तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय सुविधा याचा सर्व खर्च निविदाधारकाने द्यावयाचा आहे.

९. दौऱ्याचा प्रवास,जेवण व मुक्कामाचा तपशिल **पान क्र ४, ५ व ६ मध्ये नमूद केलेल्या भेटीच्या कार्यक्रमामध्ये नमूद केलेनुसार असणार आहे.**

१०. दौ-याच्या कालावधीत मुक्कामाच्या ठिकाणी राहण्याची व जेवणाची व्यवस्था करणे, प्रवासा दरम्यान विद्यार्थ्यांसाठी फुड पॅकेट उपलब्ध करुन देणे. (शाकाहारीव मांसाहारी मागणीनुसार) भोजनव्यवस्था, निवासव्यवस्था, प्रवास, नाष्टा चहा पाणी, गाडी पार्कींग इत्यादीची व्यवस्था करावयाची आहे. मुक्कामा दरम्यान विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र रुम्स (खोली) (प्रत्यक्षात हॉटेलच्या उपलब्धतुनसार) सर्व अत्यावश्यक साधनांसह व अधिकारी /कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र रुम्स (खोली) उपलब्ध करावयाच्या आहेत. विद्यार्थीसमवेत त्यांच्या कक्षात पुरुष शिक्षक/कर्मचारी व विद्यार्थीनींच्या कक्षात महिला शिक्षक / कर्मचारी मुक्कामी असणार आहेत.

११. विद्यार्थ्यांना टिपणीलेखन करण्यासाठी लिहिण्यासाठी वही (नोटपॅड), पेन, पेन्सील इ. स्टेशनरी स्वतंत्र पाऊचमध्ये उपलब्ध करून देणे.

१२. विमान प्रवासाकरिता Full service airline Emirates व Etihad ला प्राधान्य असेल व याबाबत अंतिम निर्णय मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी यांचा राहील.

१३. प्रवास/मुक्कामासाठी ट्रॅव्हल कीट उपलब्ध करुन देणे. (ट्रॅव्हल किटमध्ये टुथपेस्ट, टूथब्रश कंगवा शॅम्पो, साबण, हेअर ऑईल, पावडर इत्यादी दैनंदिन गरजेच्या वस्तु सोबत ट्रॅव्हल बॅग, जिल्हा परिषद लोगो असणारे जॅकेट इत्यादी बाबींची व्यवस्था करावयाची आहे.)

१४.निवड झालेल्या विद्यार्थ्यांनाअभ्यासदौरा सुरू होण्या अगोदर आदल्या दिवशी त्याच्या तालुक्यातून रत्नागिरी पर्यत आणणे व काळजीवाहकांची अभ्यासदौरा सुरू होण्याअगोदर आदल्या दिवशीची रात्री निवास,जेवण इत्यादी सोय करणे.

१५.निवड झालेल्या विद्यार्थ्यांची तालुक्यातून जिल्हा परिषद रत्नागिरी पर्यत दौऱ्याच्या सुरवातीला आणणे व दौरा समाप्तीनंतर त्यांच्या तालुक्यापर्यंत नेऊन पाहोचविणे.

**H) निविदाधारकाची जबाबदारी-**

१. प्रवासासाठी Tour Manager सोबत असणे बंधनकारक राहील.

२. प्रवासादरम्यान आवश्यक असलेल्या वस्तूंचा / सेवांचा सुस्थितीत पुरवठा करण्याची जबाबदारी मंजुर निविदाधारकाची असेल. (उदा. फुड पॅकेट, टुथ पेस्ट व तद्अनुषंगीक किट)

३. प्रवासादरम्यान पुरविण्यात येणारा सेवांचा तपशील (उदा. जेवणात देण्यात येणारे पदार्थ, राहण्याची ठिकाणे, राहण्याची व्यवस्था इ.) दौरा सुरु होण्याच्या दिनांकाच्या १५ दिवस अगोदर या कार्यालयास कळविणे तसेच त्यात काही बदल सुचविल्यास त्या प्रमाणे बदल करणे बंधनकारक आहे.

४. प्रवासादरम्यान पुरविलेल्या अन्नातून विषबाधा (Food Poisoning) वगैरे आरोग्य विषयक समस्या उद्भवल्यास त्यास निविदाधारक जबाबदार असेल आणि त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. अशा समस्या उद्भवणार नाही याची मंजुर निवीदाधारकाने दक्षता घ्यावयाची आहे.

५. अपघात झाला तर निविदाधारकाची जबाबदारी खालिलप्रमाणे असेल.
अभ्यासदौऱ्याच्या प्रवासा दरम्यान कोणत्याही स्वरूपाचा अपघात झाल्यास तातडीची वैद्यकिय सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल. यासाठी लागणारे शुल्क वैद्यकिय व अपघात विम्यातुन भरपाई करून घेण्यात यावी.

६. कोणत्याही कारणास्तव टूर (प्रवास ) रदद झाल्यास निविदा धारकाला मंजूर निविदा रक्कमेच्या अदा केलेल्या रक्कमेपैकी खालिलप्रमाणे प्रती व्यक्ती प्रमाणे रक्कमेचा परतावा करणे बंधनकारक राहील. अथवा मंजूर रक्कम अदा केली नसलेस खालिलप्रमाणे रद्द झालेल्या प्रती व्यकी मंजूर निविदा रककम कमी करून उर्वरित रक्कम अदा केली जाईल.

अ) ९० ते ७६ दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी असताना ६०% परतावा

ब) ७५ ते ३० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी असताना ३५% परतावा

क) २९ ते १५ दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी असताना २५% परतावा

ड) १४ ते ८ दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी असताना १०% परतावा

**I) टप्प्याटप्प्याने अदा करावयाच्या रक्कमा-** कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ७०% रक्कम अदा करण्यात येईल. कार्यारंभ आदेशानंतर ८ दिवसात Hotels Confirmation Vouchers on Letter head आणि प्रवासाची तिकिट बुकिंगच्या पावत्या सादर केल्यानंतर उर्वरीत २५% रक्कम अदा करण्यात येईल. उर्वरित ५% रक्कम दौऱ्याच्या यशस्वितेनंतर अदा करण्यात येईल.

बयाणा अनामत रक्कम दौऱ्याच्या यशस्वितेनंतर विहित कालावधीमध्ये परत दिली जाईल. दौऱ्यासाठी ९५%रक्कम प्रत्यक्ष दौरासुरू होण्यापूर्वीच अदा करणेत येत असल्यामुळे Dollar Escalaction अट लागू राहणार नाही.

**J) निविदाधारकाच्या देयकाची रक्कम खालील प्रमाणे आदा केले जाईल.**

१. अभ्यासदौरा यशस्वीरित्या पुर्ण झाल्यानंतर निविदाधारकाने देयक सादर करावे.

२. देयक प्राप्त झाल्यानंतर त्यातून अग्रीम स्वरूपात घेतलेली रक्कम समायोजित करून उर्वरीत रक्कम आदा केली जाईल.

३. प्रवासादरम्यान पुरविलेल्या सेवा व सोयीसुविधांबाबत शैक्षणिक सहल समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अधिन राहून देयक आदा करण्यात येईल.

**K) शास्ती आणि दंड-**

१. विहित वेळापत्रकानुसार प्रवास न झाल्यास /ठरलेल्या वेळी ठरलेल्या ठिकाणी न पोहोचल्यास निविदाधारकास रू.१,०००/- प्रती तास या प्रमाणे दंडआकारला जाईल.

२. निविदाधारकाने अग्रीम स्वरूपात रक्कम घेऊनही विहित वेळेत सेवा पुरवली नाही तर त्याचेकडून त्याने घेतलेली अग्रीम स्वरूपातील रक्कम अधिक त्यावरील बाजारभावानुसार असलेले व्याज वसूल करण्यात येईल व असा निविदाधारक फौजदारी कारवाईस पात्र राहील.

३. मंजुर निविदाधारकास अग्रिम (Advance) मंजुर केल्यानंतर त्यांना ऐनवेळी शैक्षणिक अभ्यासदौऱ्यात फेर-फार केला अथवा अभ्यासदौरा करण्यास असमर्थता दर्शविल्यास, अथवा निविदेत नमुद केल्याप्रमाणे सेवा न पुरविल्यास अशा निवीदाधारकाकडुन दिलेले संपुर्ण अग्रिम (Advance)वसुल करुन शास्ती म्हणुन अभ्यासदौऱ्याचा संपुर्ण खर्च वसुल केला जाईल व मंजुर निवीदाधारकाविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाईल.

४. प्रवासादरम्यान पुरविलेल्या सेवा व सोयीसुविधांबाबत अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवाल असमाधानकारक असल्यास सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी ठरविलेली रक्कम दंड म्हणून देयकाच्या रकमेतून वजा करण्यात येईल.

5 शैक्षणिक **अभ्यासदौऱ्या**साठी प्रवासाच्या कालावधीकरिता उतरवलेल्याअपघात विम्याची पावती. तांत्रिक लिफाफ्या सोबत विम्याची पावती सादर करावयाची नाही. ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल अशा निविदाधारकास शैक्षणिक अभ्यासदौऱ्यासाठीसहभागी होणारे विद्यार्थी/अधिकारी/कर्मचारी/शिक्षक यांची माहिती उपलब्ध करुन दिली जाईल त्यांच्या शैक्षणिक **अभ्यासदौऱ्या** दरम्यानच्या कालावधीसाठी उतरविलेल्याविम्याच्या पावत्या अभ्यासदौऱ्यापुर्वी या कार्यालयास सादर करावयाच्या आहेत.

**<u>निविदेचा तांत्रिक लिफाफा</u>**

1.नोंदणी प्रमाणपत्र- (नोंदणी प्रमाणपत्रामध्ये मूळ मक्तेदाराकडे व्यवसायाचे स्वरुप हे Travel Agency असणे आवश्यकआहे.भागिदारी असल्यास देखील मुळ मक्तेदाराच्या नोंदणी प्रमाणपत्रामध्ये व्यवसायाचे स्वरुप Travel Agency असणे बंधनकारक अन्यथा तांत्रिकदृष्टया अपात्र केले जाईल)

2. मागील तीन वर्षाचे आयकर परतावा,पॅन कार्ड व टर्नओव्हर दाखला –(Assesment Year २०२३-२४,२०२४-२५ व २०२५-२६ चा आयकर परतावा तसेच C.A. कडील मागील ०३ वर्षाचा टर्नओव्हर दाखला .)

3. GST नोंदणी प्रमाणपत्र

4.र.रु.5000/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यातील बंधपत्र

5.ऑनलाईन निविदा फी व इसारा फी भरल्यची पावती (बयाणा अनामत रक्कम भरण्यापासून सूट असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र लिफाफ्यामध्ये सादर करणे आवश्यकआहे.)

6.यापूर्वी विदेशात यशस्वी अभ्यास दौरा केल्याचे दाखले - (यामध्ये विदेशात यशस्वी अभ्यास दौरे पूर्ण केलेबाबत संबंधित यंत्रणेने दिलेले दाखले जोडणेआवश्यक असणे बंधनकारक अन्यथा तांत्रिकदृष्टया अपात्र केले जाईल)

**निविदेचा व्यापारी/आर्थिक लिफाफा (BOQ)**

या ई-निविदेतील तपशिल संपुर्णपणे वाचून व अभ्यास करून BOQ (Bill of Quantity) मधील दर संपुर्ण पॅकेज सह नमुद करावयाचा आहे. दर नमूद केल्यानंतर BOQ वेबसाईटवरअपलोड करण्यात यावी.BOQ मध्ये नमुद केलेले दर हे सर्वकरांसह नमुद करावयाचे आहेत.

तांत्रिक कारणास्तव किंवा निविदेमध्ये वाद निर्माण झाल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांजकडे राखून ठेवले आहेत.तसेच या निविदेमधील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,रत्नागिरी यांचा निर्णय हाअंतिम निर्णयराहील. तसेच याबाबत काही तक्रार निर्माण झाल्यास न्यायालयीन कार्यकक्षा रत्नागिरी शहर राहील.

**सही/-**
**(निलिमा नाईक)**
**शिक्षणाधिकारी प्राथमिक**
जिल्हा परिषद,रत्नागिरी

**सही/-**
(वैदेही रानडे,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,रत्नागिरी

**जिल्हा परिषद रत्नागिरी**
**शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद रत्नागिरी**
**शालेय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक अभ्यासदौरा**
**जाहिर फेर ई-निविदा क्र-३ सन २०२५-२६**

**बंधपत्र ५००० रुपयाचे स्टँपपेपरवर)**

मी /आम्ही गांभीर्य पुर्वक नमुद करतो की,मी / आम्ही शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद रत्नागिरी, मार्फत शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक **अभ्यासदौऱ्या**साठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असुन त्या मला/आम्हाला मान्य आहेत.या निविदेसाठी माझे/आमचे दर निविदे सोबत असलेल्या BOQ (Bill Of Quantity) मध्ये नमुद करीत आहे/आहोत.

भविष्यामध्ये लेखा परिक्षणात कोणत्याही प्रकारच्या रकमेची वसूली निघाल्यास ती या कार्यालयाने कार्यालयात जमा करावी लागेल.

जर माझे/ आमच्या निविदा स्वीकृत करण्यात आली /आल्या तर या निविदेतील सर्वअटी व शर्ती पालन करण्यास मी/ आम्ही बांधील राहीन/ राहु.या अटी व शर्तीचा भंग मी/आम्ही केल्यास निविदेतील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलानुसार मी/आम्ही दंडनीय कारवाईस पात्र राहीन/राहू.

हि निविदा स्वीकृत झाल्यास मी / आम्ही दिलेले दर हे या ई-निविदेमध्ये देण्यात आलेल्या कालावधीसाठी अंमलात राहतील.सदर मुदतीत हे दर स्वीकृत केले गेल्यास त्यादरानेअभ्यासदौ-यासाठी सेवा पुरविण्यास मी/ आम्ही बांधील राहु.

**(निविदा धारकांची स्वाक्षरी)**

**दिनांक- / /२०२६** **संपुर्ण नांव व पत्ता----------------**

Signature Not Verified
Digitally signed by Nilima Bhikaji Naik
Date: 2026.04.27 15:45:51 IST
Location: Maharashtra-MH